| MHKO070020432019 | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | दाखल दिनांक | :– | २३.१०.२०१९ | | |
| | नोंदणी दिनांक | :– | २३.१०.२०१९ | | |
| | निकाल दिनांक | :– | १३.०८.२०२४ | | |
| | कालावधी | :– | वर्ष | महिने | दिवस |
| | | | ०४ | ०९ | २१ |

**भाग– 'अ'**

**(न्यायनिर्णयाचे शिर्षक पान)**

(घोषित दिनांकः–१३/०८/२०२४ )

**जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि. कोल्हापूर येथील न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, न्यायालय क्र.२ यांचे न्यायालयात.**

**( पीठासीन अधिकारी अ.त्रिं. मनगिरे )**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.९२८/२०१९** **निशाणी क्र.७/ब**

**(गु.र.नं.१५/२०१९)**

महाराष्ट्र शासनातर्फे
पोलीस निरीक्षक,
सिमा तपासणी नाका, कागल ........ **अभियोग पक्ष**
जि.कोल्हापूर

**विरुध्द**

**संभाजी गणपती मदने,**
वय ६४ वर्षे, धंदा– शेती व खाजगी नोकरी,
रा. इंदिरानगर, शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर ......... **आरोपी**

**गुन्हयाचा सारांश** – महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५ (ई) प्रमाणे.

==========================================

श्रीमती वर्षा पारज–पाटील, सहाय्यक सरकारी अभियोक्ता सरकार पक्षातर्फे
श्री.एस.जी.जगदाळे वकील आरोपीतर्फे

==========================================

## भाग– 'ब'

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | २७/०४/२०१९ |
| गुन्हा नोंद केल्याची तारीख | २७/०४/२०१९ |
| दोषारोपपत्र दाखल झाल्याची तारीख | २३/१०/२०१९ |
| गुन्हयाचा सारांश (Plea) ठेवल्याची तारीख | २३/१०/२०१९ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | ३०/०७/२०२४ |
| न्यायनिर्णयासाठी ठेवल्याची तारीख | १३/०८/२०२४ |
| न्यायनिर्णयाची तारीख | १३/०८/२०२४ |
| शिक्षा सुनावली असल्यास, त्याची तारीख | – |

## आरोपीचा तपशील

| अ. क्र. | आरोपीचे नांव | अटकेची तारीख | जामीनावर मुक्त केल्याची तारीख | गुन्हयाच्या सारांशचे कलम | निर्दोष की दोषी | सुनावण्यात आलेली शिक्षा | वजावट कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | संभाजी गणपती मदने | २७.०४.२०१९ | २७.०४.२०१९ | महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ कलम ६५ (ई). | निर्दोष | – | – |

## भाग– 'क'

## अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची यादी

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| अभियोग पक्षाचा सा.क्र. १ | महेंद्र कोंडीबा जकाते | जप्ती पंच |

## अभियोगपक्षातर्फे दाखल केलेल्या व निशाणी क्रमांक देण्यात आलेल्या कागदपत्रांची यादी (आरोपीतर्फे मान्य करण्यात आलेली कागदपत्रे)

| अ.क्र | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| – | – | – |

आरोपीने पुरावा दिलेला नाही.

## महत्वाचा वस्तुजन्य पुरावा

| अ.क्र | महत्वाचा वस्तुजन्य पुरावा क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| –– | –– | –– |

आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५ (ई) नुसार शिक्षेस पात्र असणारा गुन्हा केल्याचा आरोप आहे.

२. अभियोगपक्षाची हकिकत, पुरावा व उभय पक्षांच्या वकिलांच्या युक्तिवादानंतर माझ्या विचाराधीन आलेले मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष विवेचनासह खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | आरोपी हा दि.२७/०४/२०१९ रोजी शिरोळ गावचे हद्दीतील इंदिरानगर, शिरोळ ता.शिरोळ येथे देशी | |

| | | |
|---|---|---|
| | दारूची विनापरवाना व बेकायदेशिरपणे विक्री करण्याच्या उद्देशाने स्वतःचे ताब्यात बाळगून असल्याचे अभियोगपक्षाने सिध्द केले काय ? | नाही |
| २ | काय आदेश? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |

## <u>का र ण मि मां सा</u>

**३.** आरोपीविरूध्द ठेवलेला आरोप सिध्द करण्याकामी अभियोग पक्षाने केवळ एक साक्षीदार नामे महेंद्र कोंडीबा जकाते (सा.क्र.१) जप्ती पंच याची साक्ष नि.७ कडे नोंदविली. अभियोगपक्षास पुरेशी संधी देवूनही साक्षीदार हजर न केल्याने मी नि.१ वरील आदेशान्वये अभियोगपक्षाचा पुरावा बंद केला. अभियोगपक्षाच्या पुराव्यात आरोपीविरूध्द दोषार्ह मजकुर न आल्याने आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ३१३ (१) (ब) अन्वये निवेदन वगळण्यात आले. याउलट आरोपीने आपल्या बचावार्थ तोंडी अथवा कागदोपत्री पुरावा दिला नाही.

### <u>मुद्दा क्रमांक १ करिता</u>

**४.** साक्षीदार क्र.१ जकाते यांच्या साक्षीचे अवलोकन केले असता त्यांनी त्यांच्या सरतपासामध्ये कथन केले आहे की, दि.२७.०४.२०१९ रोजी त्यांना कोणी कुठे बोलाविले होते हे त्यांना लक्षात नाही. पोलीसांनी त्यांचे समक्ष जप्ती पंचनामा केला नाही व आरोपीच्या ताब्यातून काहीही जप्त केले नाही. त्यांनी जप्ती पंचनाम्यावरील त्यांची सही मान्य केली, परंतु त्यातील मजकुर त्यांना माहित नसल्याचे कथन केले. अभियोगपक्षातर्फे सदर साक्षीदारास भारतीय पुरावा अधिनियम १८७२ च्या कलम १५४ नुसार उत्तर सुचक प्रश्न विचारले असता

अभियोगपक्षाच्या लाभात कोणताही कबुली जबाब त्यांच्या मुखातुन मिळु शकला नाही. त्यांनी त्यांच्या समक्ष आरोपीने बाळगलेल्या मालातुन दारू जप्त केल्याचे सांगितले नाही.

५. आरोपीला बचावाकरीता, सदर माल आरोपीने बाळगलेल्या मालातुन जप्त केला याबाबत साक्षीदार सांगत नाही. तसेच अभियोगपक्षाने सदर माल हा आरोपीने बाळगलेल्या मालातुन जप्त केल्याचे जप्ती पंचनाम्याव्दारे सिध्द केले नाही, त्यासोबतच अभियोगपक्षाने फिर्याद व जप्ती पंचनाम्यामधील मजकुर सिध्द केला नाही. तसेच अभियोगपक्षाने रासायनिक विश्लेषकाचा अहवाल दाखल केला नाही, त्यामुळे आरोपी शिक्षेस पात्र नाही, असा युक्तीवाद आरोपीच्या विधिज्ञांनी केला.

६. अभियोगपक्षाचे कथन आहे की, जप्त केलेला माल हा रासायनिक पृथक्करणासाठी रासायनिक विश्लेषक वैज्ञानिक प्रयोगशाळा, कोल्हापूर येथे पाठविलेला आहे. तथापि, अत्यंत महत्वाचे असे की त्याअनुषंगाने अहवाल अभियोगपक्षाने अभिलेखावर सिध्द केला नाही. त्यामुळे अभिकथीत जप्त केलेले द्रव हे प्रतिबंधित केलेले मादक द्रव होते व आहे असे शाबीत होत नाही. न्यायाचे तत्व आहे की, अभियोगपक्षाने आरोपीच्या विरुध्दचे आरोप सबळ पुराव्याद्वारे व योग्य संशयाच्या पलिकडे जावुन सिध्द करणे गरजेचे आहे. अभियोगपक्षाच्या पुराव्यामध्ये विसंगती आल्यास त्याचा लाभ आरोपीला मिळतो. याउलट आरोपीस निर्दोषत्व सिध्द करण्याकरिता पुरावा सादर करण्याची आवश्यकता नाही. प्रस्तुत प्रकरणात अभियोगपक्षाने फिर्याद व जप्ती पंचनामा हा सिध्द केला नाही. जप्ती पंच यांनी अभियोगपक्षास सहकार्य केले नाही. त्यामुळे एकंदर अभिलेखावरील उपलब्ध तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता अभियोगपक्षाने आरोपीवर ठेवण्यात आलेला आरोप सक्षम व परिपोषक साक्षीपुराव्यानिशी निसंदिग्धपणे सिध्द केला नाही असे माझे मत आहे. सबब मी मुद्दा क्र.१ चे

उत्तर नाही असे नोंदवित आहे व मुद्दा क्र. २ च्या उत्तरादाखल खालीप्रमाणे आदेश पारित करत आह

**:: आदेश ::**

१. आरोपी **संभाजी गणपती मदने**, रा. इंदिरानगर, शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर याची महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५ (ई) अंतर्भुत वर्णिलेल्या अपराधातुन फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम २५५ (१) मधील प्रावधानीत तरतुदीनुसार निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचा वैयक्तिक जातमुचलका व जामीनकदबा रद्द करण्यात येतो

३. अभिकथीत जप्त मुद्देमाल देशी दारुच्या बाटल्या बाबत राज्य उत्पादन शुल्क, विभाग कोल्हापूर यांनी अपील कालावधीनंतर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ चे कलम १०१ प्रमाणे कार्यवाही करावी.

४. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४३७ (अ) प्रमाणे रक्कम रु.१५,०००/– चा वैयक्तीक जातमुचलका व तितक्याच रक्कमेचा जामीन कदबा दयावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायदान कक्षात देण्यात व घोषीत करण्यात आला)

AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Digitally signed by AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Date: 2024.08.13 16:19:55 +0530

**(अ.त्रिं. मनगिरे)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,न्यायालय क्र.२
जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

दिनांक: १३/०८/२०२४

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Shri.R.L.Mane. |
| Name of Court | 2nd Jt.C.J.J.D.& J.M.F.C., Jaysingpur. |
| Date of Dictation. | 13/08/2024. |
| Judgment/order signed by the PO on | 13/08/2024. |
| Judgment/order uploaded on | 13/08/2024. |